राज्य शासनाच्या धोरणात्मक योजनांमध्ये प्रत्यक्ष अनुभव व प्रतिक्रिया समाविष्ट करुन कार्यक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने उत्कृष्ट कार्यपद्धतीचे एकत्रिकरण करणे व राज्यभर विस्तारक्षम करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

## शासन निर्णय क्रमांकः कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/समन्वय-३

पहिला मजला, मंत्रालय मुख्य इमारत
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: १२ नोव्हेंबर, २०२५

**वाचा -**

१) शासन निर्णय क्रमांकः महसूल व वन विभाग क्र. कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८, दिनांक ९ एप्रिल २०२५

२) शासन निर्णय क्रमांकः महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६३/ल-१, दिनांक १८ एप्रिल २०२२

**प्रस्तावना -**

१०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिनांक ४ व ५ एप्रिल, २०२५ रोजी पुणे येथे महसूल विभागामार्फत सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांची दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय पातळीवर राबविण्यात येत असलेल्या विविध लोकाभिमुख विषय /कार्यक्रमांचे सादरीकरण जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात आले आहे. शासनाच्या धोरणात्मक उपाययोजनांमध्ये सामान्य नागरिकांच्या गरजा समजून घेणे व त्यानुसार प्रशासनाच्या प्रक्रिया सुधारित करण्याची आवश्यकता दिसून येते. हे लक्षात घेता, सदर कार्यशाळेच्या वेळी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशास अनुसरुन महसुली विभागस्तरावरील प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती अशा एकूण विषयवार ६ अभ्यास समित्यांची स्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या समित्यांची प्रमुख उद्दीष्टे म्हणजे प्रशासनाच्या विविध स्तरांवर विद्यमान कार्यपद्धती, योजनांची प्रभावितता, कामकाज पद्धती व माहिती व्यवस्थापन प्रणाली यांचे सखोल मूल्यांकन करून, सुसंगत आणि सुधारीत उपाययोजना सुचवणे हा आहे.

**उपरोक्त शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली “उत्कृष्ट कार्यपध्दतीचे एकत्रिकरण करणे व त्या राज्यभर विस्तारक्षम करणे” याबाबत समिती क्र. ३ चे कार्य सोपविण्यात आले होते.**

सदर समिती क्र. ३ कडून दिनांक १७/०६/२०२५ रोजी शासनास अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये एकूण १२ उपक्रम सुचविण्यात आले होते. यापैकी २ उपक्रम गृह विभागाशी संबंधित आहेत, २ उपक्रम मदत व पुनर्वसन विभागाशी संबंधित आहेत, १ उपक्रम पाणी पुरवठा विभागाशी संबंधित आहेत व ७ उपक्रम महसूल विभागाशी संबंधित आहेत. सदर समितीने जे उपक्रम सुचविले होते, त्यापैकी महसूल विभागाशी संबंधित उपक्रम राज्यातील सर्व जिल्ह्यांनी राबवावे, असे शासन स्तरावरून निर्देश देण्याची बाब विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने शासनास सादर केलेल्या १२ उपक्रमांपैकी महसूल विभागाशी संबंधित ७ उपक्रमांची (सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद) उपयोगिता विचारात घेता, सदर उपक्रम संपूर्ण राज्याकरीता लागू करण्याबाबत शासनाकडून याद्वारे आदेशित करण्यात येत आहे.

### १) सेवादूत प्रणाली:-

महसूल विभागामार्फत नागरीकांना विविध सेवा पुरविण्यात येतात. यासाठी नागरीकांना विविध अडचणी येत असल्याचे दिसून येतात. जसे की, नागरीकांना विविध कामासाठी शासकीय कार्यालयात वारंवार यावे लागते, सेतू किंवा आपले सरकार केंद्रावर रांगेत उभे राहावे लागते, शासकीय सेवांसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती नसते, दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरीकांना अडचणी येतात, कामाच्या वेळा व सुट्टयांमुळे केंद्रावर जाण्यास अडथळे येतात. त्यामुळे सेवेच्या प्रक्रियेतील वेळ आणि श्रम यांचा अपव्यय होतो.

त्या अनुषंगाने यावर उपाय म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेमार्फत सेवादूत प्रणाली यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. याद्वारे नागरिक स्वत: संकेतस्थळावरून आवश्यक सेवेची नोंदणी करू शकतात. "सेवादूत" या उपक्रमामध्ये नागरिक वेब पोर्टल किंवा अँड्रॉइड ॲपव्दारे अपॉईंटमेंट बुकिंग करुन हवी ती शासकीय सेवा त्यांना सोयीस्कर दिवशी आणि वेळेस VLE किंवा कॉल सेंटरच्या माध्यमातून घरपोच मिळवू शकतात. या उपक्रमाच्या कार्यान्वयासाठी कुठलीच वेगळी यंत्रणा लागत नाही, यासाठी आधीच अस्तित्वात असलेले आपले सरकार सेवा केंद्र चालक "सेवादूत" म्हणून जबाबदारी पार पाडतात. तसेच या कामी आवश्यकतेनुसार अधिकची फिरती सेवाकेंद्र निर्माण

करता येतील. तसेच आवश्यकतेप्रमाणे अधिकचे VLE यांची नेमणूक करता येईल. नागरिकांना सेवेसाठी आवश्यक शासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांचा दाखला किंवा प्रमाणपत्र घरपोच देण्यात येते.

**२) ई-नझूल (जमीन वर्ग-२ चे वर्ग-१ मध्ये रुपांतरण करणे) :-**

महाराष्ट्रातील नझूल जमिनीचे तसेच इतर भोगवटादार वर्ग २ जमिनीचे व्यवस्थापन हे पारंपरिक, कागदी नोंदीवर आधारित आणि वेळखाऊ प्रक्रियांमुळे अकार्यक्षम व अपारदर्शक असल्याची भावना नागरिकामंध्ये होती. या समस्यांवर मात करण्यासाठी ई-नझूल पोर्टल हे एक डिजिटल व्यासपीठ म्हणून विकसित करण्यात आले आहे. सदर पोर्टलद्वारे नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने सहजरित्या आपल्या नझूल जमिनींचे वर्ग १ करणे, विभाजन विक्री-हस्तांतरण NOC, भाडेपट्टा नूतनीकरण, तारण परवानगी इत्यादी सुविधा सुलभपणे व जलदगतीने मिळतात. या पोर्टलचा उद्देश नझूल जमिनीच्या तसेच इतर भोगवटादार वर्ग २ जमिनीचे कारभारात पारदर्शकता, गती आणि कार्यक्षमता निर्माण करणे आहे.

ई - नझूल हे महसूल प्रशासनातील एक महत्त्वपूर्ण सुधारणा असून नागरिक-केंद्रित सेवा वितरण आणि पूर्ण डिजिटायझेशनद्वारे आधुनिक जमीन व्यवस्थापनाची सुरुवात आहे. या अनुषंगाने नझुल जमीनीच्या अनुषंगाने शर्तभंग नियमानुकूल करणे, जमीन फ्री होल्ड करणे अशा सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याकरिता ई-नझूल प्रणाली विकसित केलेली आहे. समितीपुढे या प्रणालीचे सादरीकरण करण्यात आले. विद्यमान ई-नझूल प्रणालीमध्ये फक्त नझूल जमिनीचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, या प्रणालीची उपयुक्तता विचारात घेता राज्यातील वर्ग-२ जमिनी वर्ग-१ करताना नागरिकांना ज्या अडचणी येतात त्या अडचणी दूर व्हाव्यात म्हणून सध्याच्या सुविधेचे विस्तारीकरण करण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेमार्फत ई-नझूल प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. याद्वारे नागरिक स्वत: संकेतस्थळावरून नोंदणी करू शकतात. नागरिकांना सेवेसाठी आवश्यक शासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नागरीकांना याचा लाभ घेता येईल.

तसेच सदर प्रणालीमुळे नझूल जमीन वापरात बदल, शर्तभंग नियमन, नझुल जमिनींचे नूतनीकरण, हक्क हस्तांतरण, शेतजमिनींचे वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतरण करणे इत्यादीबाबत ई-नझूल पोर्टल हे महाराष्ट्रातील नझूल जमिनीच्या डिजिटायझेशन आणि कार्यक्षम व्यवस्थापनाची दिशादर्शक प्रणाली ठरेल.

### ३) 'महासंपर्क' महसूल विभागासाठी चॅटबोट आणि १२x७ केंद्रीय कॉल सेंटर प्रणाली:-

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांनी शासनाच्या विविध महसूल विषयक सेवा सहजतेने, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळवाव्यात यासाठी एक सक्षम व सुसंगत सेवा प्रणाली असणे आवश्यक आहे. आजघडीला नागरिकांना त्यांच्या तक्रारी, माहितीची गरज, तसेच सेवा-संपर्काकरिता अनेकदा प्रत्यक्षपणे महसूल कार्यालयात जावे लागते, ज्यामुळे वेळ, पैसा व श्रम यांची नासाडी होते. त्यामुळे प्रत्येकासाठी सहज उपलब्ध असलेली एकच केंद्रित संपर्क सुविधा म्हणजेच १२x७ (दिवसाला १२ तास आणि आठवडयाचे ७ दिवस) कार्यरत केंद्रीय कॉल सेंटर स्थापन करणे ही काळाची गरज बनली आहे.

सध्या महसूल विभागात कोणतेही केंद्रीकृत कॉल सेंटर कार्यरत नाही. नागरिकांना आपल्या तक्रारींसाठी स्थानिक कार्यालयांना भेट द्यावी लागते किंवा पत्र व्यवहार करावा लागतो. कोणतीही स्वयंचलित तक्रार नोंदणी, ट्रॅकिंग व विश्लेषण प्रणाली नसल्यामुळे, तक्रारींचा व्यवस्थित मागोवा घेता येत नाही. बऱ्याचदा विभागीय स्वरूपात तक्रारींच्या वेगवेगळ्या नोंदवह्या ठेवल्या जातात, ज्यामुळे एकत्रित माहिती मिळवणे अशक्य होते. ही पोकळी दूर करून, नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये प्रभावी संवाद साधण्यासाठी केंद्रीय कॉल सेंटरची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते.

त्याअनुषंगाने चॅटबोटच्या माध्यमातून सद्यस्थितीमध्ये अशी सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता व या सेवेचा विस्तार करून महसूल विभागासाठी **१२x७** केंद्रीय कॉल सेंटर प्रणाली विकसित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचेमार्फत **'महासंपर्क' महसूल विभागासाठी चॅटबोट आणि १२x७ केंद्रीय कॉल सेंटर प्रणाली** तयार करण्यात आलेली आहे. तसेच या सारखाच उपक्रम जिल्हाधिकारी अमरावती यांनी देखील राबविलेला आहे. याद्वारे नागरिक स्वत: संकेतस्थळावर नोंदणी करू शकतात. नागरिकांना सेवेसाठी आवश्यक शासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नागरीकांना याचा लाभ घेता येईल. त्यामुळे संपूर्ण राज्यभरातील नागरिकांसाठी एकसंघ संवाद माध्यम उपलब्ध करून देणे. हे माध्यम तक्रारींचे जलद व पारदर्शक निवारण करेल, सेवा माहिती एका ठिकाणी उपलब्ध करून देईल, तसेच आपले सरकार सारख्या ई-प्लॅटफॉर्मशी एकत्रितपणे कार्य करेल. मराठी भाषेत संवाद हे या कॉल सेंटरचे वैशिष्ट्य असेल.

त्यामुळे प्रस्तावित कॉल सेंटर सुरू झाल्यानंतर महसूल विभागाच्या कार्यपद्धतीमध्ये गुणवत्ता सुधारणा होईल, नागरिकांच्या सेवाव्यवस्थेला अधिक विश्वासार्ह व उत्तरदायी स्वरूप प्राप्त होईल. प्रत्येक तक्रार CRM प्रणालीद्वारे नोंदवली जाईल व तिला युनिक ट्रॅकिंग आयडी दिला जाईल. त्यामुळे कोणतीही तक्रार दुर्लक्षित राहणार नाही. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्याचं रिअल टाइम मॉनिटरिंग करता येईल. यामुळे सेवांमध्ये पारदर्शकता येईल आणि जबाबदारी निश्चित होईल. तसेच

राष्ट्रीय माहिती-विज्ञान केंद्र (NIC) व माहिती तंत्रज्ञान विभाग महाराष्ट्र राज्य, भारत संचार निगम मर्यादित (BSNL) / दूरसंचार विभाग (Department of Telecom) यांचे तांत्रिक सहाय्यक म्हणून मदत घेता येईल. यामध्ये मिळालेल्या सेवेबाबत नागरीकांचा अभिप्राय (feedback) प्राप्त करून घेता येईल. तसेच पुरविण्यात आलेल्या सेवेबाबत नागरीकांना १ ते ५ गुणांकन (Star Rating) देण्याबाबतची सुविधा उपलब्ध करून देता येईल.

४) **प्रत्यय** - (eQJ Courts २.०):-

प्रत्यय (पेपरलेस अपील अँड रिव्हीजन इन ट्रान्सपरंट) वे हे एक ऑनलाईन पोर्टल आहे ज्याद्वारे वापर करताना महाराष्ट्र राज्यातील विविध विभागातील अर्धन्यायीक प्रकरणांच्या सद्यस्थितीची माहिती प्राप्त करून घेता येते. संबंधित वेबसाईट वापर करताना नागरिकांना विविध सेवा प्रदान करते. जसे की, अर्धन्यायिक प्रकरणांची सुलभ नोंदणी, सुलभ रित्या ऑनलाइन प्रकरणे दाखल करणे, एका क्लिकवर प्रकरणांची सद्यस्थिती तपासणी करता येईल, अर्धन्यायिक प्रकरणात पारित आदेश सहजरित्या प्राप्त करून घेण्याची सुविधा निर्माण होईल, तसेच पूर्वीचे न्यायालयीन संदर्भ सहजरीत्या उपलब्ध होईल, अर्धन्यायिक प्रकरणात चालणारी सुनावणी ऑनलाइन पद्धतीने पाहण्यास उपलब्ध होईल, प्रकरणातील सुनावणींचे डॅशबोर्ड उपलब्ध असल्याने वेळेची बचत होईल, विविध विभागा अंतर्गत चालणारी अर्धन्यायिक प्रकरणे एकाच प्रणालीवर उपलब्ध होतील, सामान्य नागरिकांना विविध विभागांमध्ये अर्धन्यायिक प्रकरणे दाखल करताना होणारा त्रास तसेच वेळेची बचत होईल, प्रकरणात पारित आदेश संबंधित विभागांना अंमलबजावणी करीता ऑनलाइन पाठवणेची सुविधा उपलब्ध होईल.

त्याअनुषंगाने जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत **प्रत्यय**- (eQJ Courts २.०) पोर्टल तयार करण्यात आलेले आहे. अपर जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत eQJ Courts राज्यभर राबविण्याचे दृष्टीने प्रायोगिक तत्वावर काम सुरू आहे. याद्वारे नागरिक स्वत: संकेतस्थळावरून नोंदणी करून शकतात. नागरिकांना सेवेसाठी आवश्यक शासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नागरीकांना याचा लाभ घेता येईल.

**५) महारेव्हेन्यु पोर्टल आणि ॲप, एकात्मिक महसूल पोर्टल** (Integrated Maharevenue Portal & App):-

महसूल विभागामार्फत नागरिकांना विविध प्रकारच्या नोंदणी, जमीन मोजणी, दस्तऐवज व जमीनविषयक सेवा पुरविल्या जातात. सध्या या सर्व सेवा स्वतंत्र प्लॅटफॉर्मवर चालतात आणि त्यामुळे

सेवा वितरणात विसंगती, माहितीची पुनरावृत्ती, वेळखाऊ प्रक्रिया आणि नागरिकांना असुविधा निर्माण होते.

या अडचणी दूर करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत एक एकात्मिक महसूल पोर्टल (Integrated Revenue Portal - IRP) विकसित करण्यात येत असून, यामध्ये API Integration, Single Sign-On (SSO), आणि वापरकर्ता-अनुकूल Dashboard चा समावेश राहील. पोर्टलमधून नागरिक, अधिकारी / कर्मचारी आणि प्रशासक यांना त्यांच्याशी संबंधित सर्व सेवा एका प्लॅटफॉर्मवर सुरक्षितपणे आणि पारदर्शक रीतीने मिळतील.

सदर पोर्टलचे वैशिष्ट्य खालीलप्रमाणे आहेत :-

- सर्व सेवा एकाच ठिकाणी: नोंदणी व महाणिरीक्षक विभाग, भूमी अभिलेख व महसूल विभागाच्या संबंधित सेवा एकत्र,
- SSO (Single Sign-On) प्रणाली : एकच लॉगिन करून सर्व सेवा उपलब्ध,
- Role-Based Access: नागरिक, अधिकारी व प्रशासक यांच्यासाठी वेगवेगळे डॅशबोर्ड,
- API Integrations: अंतर्गत आणि बाह्य प्रणालीशी थेट संवाद,
- मोबाईल ॲप व mGovernance: अंगठ्यावरील सेवा सहज उपलब्ध, GIS व Blockchain Support: जमीन नोंदणी व दस्तऐवज सुरक्षितता,
- AI Chatbot: सेवा माहिती व तक्रार सहाय्यता इत्यादी.

त्यामुळे तीनही विभागाने प्रशासकीय समन्वय व प्रक्रिया कार्यक्षमतेत वाढ होवून विविध महसूल सेवा एकत्र आल्यामुळे विभागीय समन्वय सुलभ होईल आणि मानव हस्तक्षेपावर आधारित त्रुटी व विलंब कमी होतील. तसेच डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया व पारदर्शक प्रशासन निर्माण करण्याकरीता Real-time डेटा, Audit Trails व मॉनिटरिंग सुविधांमुळे धोरणात्मक निर्णय अधिक प्रभावी व उत्तरदायी होतील.

**६) अभिप्राय कक्ष:-**

**"अभिप्राय कक्ष"** या नाविण्यपूर्ण उपक्रमाची दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे सुरुवात करण्यात आली आहे. भ्रष्टाचाराला आळा घालणे, शासनाच्या सर्व सेवा पारदर्शक पध्दतीने, गुणवत्तापुर्वक, गतिमान व विहित कालमर्यादेत नागरिकांना पुरविणे, सेवाविषयक सुधारणा करणे याकरिता अभिप्राय कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

सदर उपक्रमाअंतर्गत नेमलेले ऑपरेटर अर्जदाराशी दुरध्वनीद्वारे संपर्क साधून शासकीय सेवेविषयी अर्जदाराचे अभिप्राय जाणून घेतात. लोकसेवा अधिकारी विभाग (RTS) या अभिप्रायाविषयी संबंधित विभागाला कळवून वस्तुस्थिती लक्षात आणून देतात. त्यावर संबंधित विभाग योग्य ती कार्यवाही करुन लोकसेवा अधिकारी विभाग (RTS), जिल्हा कार्यालयाकडे आपला अहवाल पाठवितात. त्यानुसार लोकसेवा अधिकार नियमाचे अंतर्गत जिल्हाधिकारी हे मासिक आढावा सभेमध्ये सदर अभिप्रायांविषयी आढावा घेतात.

केंद्र आणि राज्य शासनाच्या ऑनलाईन सेवा लाभार्थ्यांपर्यंत सुरळीतपणे, वेळेत व निर्धारित शुल्कात उपलब्ध होत आहे किंवा नाही, इत्यादी गुणवत्ता तपासणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तसेच याद्वारे शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवेबाबतचे अनुभव नागरिकांकडून जाणून घेऊन, त्यांना विविध सेवा व शासनाच्या कामाबद्दल त्यांच्या प्रतिक्रिया नोंदविण्याची संधी देवून व त्यानुसार अनुभवांचे / प्रतिक्रियांचे विश्लेषण करून त्याआधारे आवश्यक बदल किंवा सुधारणा करून नागरिकांना अभिप्राय नोंदविण्यासाठी ऑनलाईन फॉर्म, ई-मेल किंवा थेट संपर्क साधून अभिप्राय नोंदविण्याची सोपी व सोईस्कर पध्दत उपलब्ध करून देता येते.

त्यामुळे शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक पध्दतीने, गुणवत्तापुर्वक, गतिमान व विहित कालमर्यादेत जिल्ह्यातील नागरिकांना मिळण्यास मदत होते. तसेच नागरिकांना शासनाचे कामात सक्रिय सहभाग नोंदविण्याची संधी मिळते.

करीता नागरिकांकडून प्रतिक्रिया मिळाल्यामुळे त्याआधारे शासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवेत सुधारणा करुन त्या अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेमार्फत अभिप्राय कक्ष विकसित करण्यात आला आहे.

### ७) **ई- सुनावणी सुविधा:-**

महसूल विषयक न्यायालयीन प्रकरणामध्ये नागरिकांना तांत्रिक सुविधेचा वापर करुन घरबसल्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सुनावणीमध्ये सहभागी होता यावे आणि न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक व्हावी हे सुनिश्चित करण्यासाठी ई-सुनावणी सुविधा उपक्रम अकोला जिल्ह्यामध्ये राबविण्यात आलेला आहे.

याअंतर्गत संबंधित कार्यालय / प्राधिकरण प्रकरण निश्चित करेल आणि सुनावणीची तारीख ठरवेल, तसेच प्रकरणातील पक्षकार यांना सूचनापत्र देतांना सदर सूचनापत्रामध्ये पक्षकार हे प्रत्यक्ष किंवा व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे Online पध्दतीने हजर राहणार याबाबतचा विकल्प त्यामध्ये देण्यात

येईल. तसेच ई- सुनावणी कामी प्रत्येक तहसील कार्यालयाचे स्तरावर ई- सुनावणीची सुविधा उपलब्ध करून देऊ शकतील अशा किमान १० कक्ष (cubicles) ची निर्मिती करण्याकरीता तहसिल कार्यालयात वेंडरला जागा उपलब्ध करून देण्यात येईल. तहसिल कार्यालयात ई-सुनावणी कक्षाकरीता जागा उपलब्ध नसल्यास त्यांना लगतच्या परिसरात जागा उपलब्ध करून देण्यात येईल. ज्यांना ई- सुनावणीस उपस्थित राहावयाचे आहे असे अधिव्याख्याता आणि पक्षकार या कक्षामधून ई- सुनावणीचे दिवशी उपस्थित राहतील. सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अशा कक्षाचा (cubicles) वापर ई- सुनावणी कामी करण्यात येईल. त्यानंतर सुनावणीचे दिवस सोडून इतर दिवशी संबंधित वेंडर हे या कक्षाचा वापर त्यांचे अन्य कार्यालयीन कामकाजाकरीता करू शकतील. अशा प्रकारे ई- सुनावणी कक्ष (Dedicated Hearing Cubicles) उपलब्ध करून दिल्यामुळे न्यायालयीन शिस्तीचे पालन होईल. तसेच अशिक्षित व तंत्रज्ञानाचे फारसे ज्ञान नसणाऱ्या पक्षकारांना देखील सुविधा उपलब्ध होईल. या ई- सुनावणी कक्षामधून संबंधित वेंडर हे पक्षकारांना आवश्यक असणारी कागदपत्रे अपलोड करण्याकरिता मदत करतील.

ई-सुनावणी ही प्रक्रिया न्यायालयीन कामकाज अधिक पारदर्शक सुलभ आणि वेळेची बचत करणारी आहे. ग्रामीण नागरिकांसाठी ही सुविधा खऱ्या अर्थाने डिजिटल भारतच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे. त्यामुळे **ई-सुनावणी प्रणाली** हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात राबविल्यास महसूल विषयक न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक निश्चितच होईल.

जिल्हाधिकारी, अकोला यांचेमार्फत **"ई-सुनावणी प्रणाली"** विकसित करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील या यशस्वी उपक्रमाच्या धर्तीवर ही ई-सुनावणी प्रणाली संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये लागू करणे गरजेचे आहे. यामुळे महसूली न्यायालयीन कामकाज अधिक प्रभावी, गतिशील आणि नागरिकाभिमुख होईल. त्यामुळे सामान्य नागरीक व प्रशासनासाठी उपयुक्त अशी प्रणाली राज्यभर कार्यान्वीत करणे आवश्यक आहे.

८) वरीलप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रमांची उपयुक्तता विचारात घेता प्रत्येक उपक्रम राज्यभर लागू करण्याकरिता व त्याकरिता आवश्यक असणारी संगणकीय प्रणाली संपूर्ण तयार करुन राज्यात लागू करण्याकरीता शासन निर्णय दि.१८.४.२०२२ अन्वये गठीत केलेली राज्यस्तरीय एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी समिती करेल.

९) प्रत्येक उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लागणारी संगणकीय आज्ञावली निर्माण करणे, त्याकरिता सल्लागार ( Consultant) नेमणे, NIC किंवा माहिती व तंत्रज्ञान विभागाचे मार्गदर्शन घेणे, ई निवीदा (e Tender) प्रसिद्ध करणे, पथदर्शी प्रकल्प (Pilot Project Run) सुरू करणे, आवश्यक डाटा सेंटर निर्माण करणे व चाचणी करणे, संगणकीय प्रणालीचे मेंटेनन्स करणे, Data Security ची

सुनिश्चिती करणे, आवश्यक निर्णयाचे प्रारूप शासनाला सादर करणे व इतर अनुषंगिक कामे पार पाडणे हे “राज्यस्तरीय एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी समिती ” चे काम असेल.

१०) उपरोक्त ७ प्रणालींची उपयोगिता विचारात घेता सदर प्रणाली संपूर्ण राज्यात लागू करण्याकरीता शासन निर्णय दि.१८.४.२०२२ अन्वये गठीत केलेली राज्यस्तरीय एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी समिती यांनी शासन निर्णयाच्या मुद्दा क्रमांक ८ व ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

११) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१११२१८१८२०५९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANISHA K JAYBHAYE

Digitally signed by MANISHA K JAYBHAYE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=01343097b2445ecf81676f921be86528e4e82e29792fd17cca89302f5fd01ef6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3B4284299520D55C5401385D853BB77E465E2E417BCFDDF3EBB6235BB48DEEFA, cn=MANISHA K JAYBHAYE
Date: 2025.11.14 18:31:37 +05'30'

**( मनिषा जायभाये )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, महसूल / मा. राज्यमंत्री, महसूल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव (महाराष्ट्र राज्य) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) सर्व जिल्हाधिकारी.
१५) सर्व सह सचिव/ उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी
१७) विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक
१८) सर्व उपसंचालक, भूमी अभिलेख
१९) सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख

२०) राष्ट्रीय सूचना विज्ञान/ CDAC अधिकारी
२१) राज्य सूचना विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई.
२२) जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी.
२३) अपर जिल्हाधिकारी, एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष.
२४) राज्य समन्वयक, ई-फेरफार प्रकल्प
२५) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२६) महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परीक्षा) मुंबई.
२७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२७) निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई
२८) निवडनस्ती समन्वय ३

## प्रपत्र "अ"

| अ. क्र. | नाविण्यपूर्ण उपक्रम | पथदर्शी उपक्रम (Pilot Project) राबविणाऱ्या कार्यालयाचे नाव | प्रकल्प राज्यभर विस्तारीत करण्याकरीता जबाबदार प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit) प्रमुखाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सेवादूत प्रणाली | जिल्हाधिकारी, वर्धा | राज्यस्तरीय एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी समिती |
| २ | ई-नझूल (जमीन वर्ग-२ चे वर्ग-१ मध्ये रुपांतरण करणे) | जिल्हाधिकारी, नागपूर | |
| ३ | 'महासंपर्क' महसूल विभागासाठी चॅटबोट आणि १२x७ केंद्रीय कॉल सेंटर प्रणाली | जिल्हाधिकारी, कोल्हापूर | |
| ४ | प्रत्यय - (eQJ Courts २.०) | जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे | |
| ५ | महारेव्हेन्यु पोर्टल आणि ॲप, एकात्मिक महसूल पोर्टल (Integrated Maharevenue Portal & App) | - | |
| ६ | अभिप्राय कक्ष | जिल्हाधिकारी, यवतमाळ | |
| ७ | ई- सुनावणी सुविधा | जिल्हाधिकारी, अकोला | |